# बोर्ड प्रश्नपत्रिका : मार्च २०१४

**वेळ: २ तास** **एकूण गुण : ४०**

**सूचना:**

i. सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.

ii. उजवीकडील अंक पूर्ण गुण दर्शवतात.

iii. **१ ते ५** प्रश्न इतिहास व **६ ते ९** प्रश्न राज्यशास्त्र या विषयावरील आहेत.

**१. अ. कंसात दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा:** [३]

१. पोर्तुगीज राजा __________ याने नौकानयनाला उत्तेजन दिले.
(विल्यम, हेन्री, निकोलस)

२. पहिल्या महायुद्धानंतर जर्मनीत स्थापन झालेले संविधान __________ या नावाने ओळखले जाते.
(जेन्रो, नाझीवाद, वायमर)

३. आंतरराष्ट्रीय व्यापाराची चळवळ __________ येथे सुरू झाली.
(आशिया, आफ्रिका, युरोप)

**ब. 'अ' स्तंभातील घटकांशी 'ब'स्तंभातील घटकांबरोबर योग्य जोड्या लावा:** [३]

| | 'अ' स्तंभ | | 'ब' स्तंभ |
|---|---|---|---|
| १. | फ्रान्स | अ. | अपोलो-११ |
| २. | रशिया | ब. | पाँडिचेरी (पुदुच्चेरी) |
| ३. | चीन | क. | स्पुटनिक-१ |
| | | ड. | कॅन्टन |

**२. खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी २५ ते ३० शब्दांत लिहा (कोणतेही दोन):** [४]

१. इ.स. १८९८ साली रशियन सोशल डेमॉक्रॅटिक लेबर पार्टीची स्थापना कशी झाली?

२. राष्ट्रसंघाची उद्दिष्टे कोणती होती?

३. भारताच्या स्वातंत्र्यप्राप्तीसाठी क्रांतिकारकांनी कोणता कार्यक्रम आखला?

**३. खालील विधानांची कारणे प्रत्येकी २५ ते ३० शब्दांत लिहा (कोणतेही दोन):** [४]

१. डॉ. होमी भाभा यांना 'भारतीय अणुयुगाचे जनक' मानले जाते.

२. तोकुगावा शोगुनशाहीच्या ऱ्हासास सुरुवात झाली.

३. अमेरिकेने ६ एप्रिल १९१७ रोजी जर्मनीविरुद्ध युद्ध पुकारले.

**४. खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी ४० ते ५० शब्दांत लिहा (कोणतेही दोन):** [६]

१. जर्मनीत हिटलरने कशा प्रकारे सत्ता मिळविली?

२. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या स्थापनेपूर्वीची पार्श्वभूमी विशद करा.

३. जालियनवाला बाग हत्याकांडाची माहिती लिहा.

**५. खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी ६० ते ८० शब्दांत लिहा (कोणतेही दोन):** [८]

१. जागतिकीकरणाचे फायदे विशद करा.

२. पहिल्या महायुद्धाचे परिणाम लिहा.

३. नानकिंगच्या तहाविषयी सविस्तर माहिती द्या.

**६. कंसात दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा:** [३]

१. ऑस्ट्रेलियामध्ये घटनादुरुस्तीसाठी __________ हा मार्ग वापरला जातो.

(जनपृच्छा, सार्वमत, प्रत्यावाहन, जनउपक्रम)

२. विविधतापूर्ण समाज जास्त __________ असतो.

(असहिष्णू, सहिष्णू, धोकादायक, समान)

३. __________ नसेल, तर राजकीय समानता निरर्थक ठरू शकते.

(श्रीमंती, सामाजिक समानता, देशाची प्रगती, जागरूकता)

**७. खालील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे द्या (कोणतेही तीन):** [३]

१. राजकीय पक्षांचे प्रमुख उद्दिष्ट कोणते असते?

२. प्रातिनिधिक लोकशाही अपरिहार्य का आहे?

३. संघराज्य पद्धत म्हणजे काय?

४. आर्थिक विषमता असेल, तर लोकशाहीला कोणती जबाबदारी उचलावी लागते?

५. जगातील कोणत्या देशांमध्ये राजकीय पक्षांवर बंदी आहे?

**८. खालील विधाने चूक की बरोबर ते सकारण स्पष्ट करा (कोणतेही दोन):** [४]

१. चीनमध्ये खऱ्या अर्थाने लोकशाही शासन नाही.

२. अमेरिकेत नागरिकांना शस्त्र बाळगण्यावर बंधने नाहीत.

३. प्रत्येक समाज सर्व बाबतीत एकसारखा असतो.

**९. खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे उत्तर २५ ते ३० शब्दांत लिहा:** [२]

१. 'राजकीय पक्ष हे जनता आणि सरकारमधील दुवा असतात' हे स्पष्ट करा.

२. शासन व्यवहाराचे स्वरूप गुंतागुंतीचे असते असे का म्हटले आहे ते स्पष्ट करा.